**राज्यातील ग्रामीण व नागरी भागातील जलशुध्दीकरण केंद्रास भेटी देण्यासाठी कायम अभ्यागत मंडळ नेमण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्र. ग्रापापु १०००/प्र.क्र. ८२/पापु०७**
**मंत्रालय, मुंबई ४०००३२,दि. १८ जुलै २०००**

**प्रस्तावना :-**

राज्यामध्ये मागील काही वर्षात पाणी पुरवठा क्षेत्रात फार मोठया प्रमाणात गुंतवणुक करुन ग्रामीण व नागरी भागासाठी ब-याच नळ पाणी पुरवठा योजना सुरु करण्यात आल्या आहेत. योग्य प्रमाणात पाणी पुरवठा करणे हया उद्देशाबरोबरच नागरीकांना शुध्द जंतुविरहीत पाण्याचा पुरवठा व्हावा हा महत्वाचा उद्देश या योजनांचे नियोजन करताना समोर ठेवून योजनेच्या उपांगात जलशुध्दीकरण केंद्राची तरतुद करुन ती उभारण्यात आली आहेत.

२. या शुध्दीकरण केंद्रामधून संबधीत भागातील ग्रामीण व नागरी जनतेला शुध्द व निर्जंतुक पाण्याचा पुरवठा होणे अपेक्षित आहे. परंतु राज्यातील काही जलशुध्दीकरण केंद्रांची पहाणी केली असता तेथील परिस्थिती फारच चिंताजनक असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. जलशुध्दीकरणासाठी वापरली जाणारी यंत्रे ज्या हेतूने बसवली आहेत तो सफल होणेसाठी त्याचा वापर देखभाल व दुरुस्ती शास्त्रशुध्द पध्दतीने होणे आवश्यक आहे. परंतु तसा वापर न होता उलट या उपांगाच्या चुकीच्या वापरामुळे पाण्याच्या प्रतीवर विपरीत परिणाम होतो असे निदर्शनास आले आहे. जलशुध्दीकरण केंद्रामधील एखादे उपांग उदा. फ्लॅशमिक्सर क्लॅरीफायरचा एखादा भाग, मिटर्स इ. बंद असल्याचे तसेच पाण्यावर जलशुध्दीकरण केंद्रात सर्व प्रकारच्या प्रक्रीया केल्यानंतर सर्वात शेवटी जिथे शुध्द व निर्जंतुक पाणी एकत्रित येते तेथील शुध्द पाण्याच्या टाक्यांना झाकण नसणे, जेथे झाकणे आहेत त्यांना गंज लागलेला असणे अशा बाबी निदर्शनास आल्या आहेत व त्यामुळे जलशुध्दीकरणाच्या मूळ उद्देशालाच फटका बसतो. एकूणच जलशुध्दीकरण केंद्राच्या वापर, देखभाल, दुरुस्ती व शास्त्रशुध्द व्यवस्थापानात अक्षम्य दुर्लक्ष /दिरंगाई व टाळाटाळ होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

३. या सर्व बाबींना आळा घालून राज्यातील पाणी पुरवठा केंद्रामधून जनतेस शुध्द व निर्जंतुक पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व्हावा आणि यामध्ये कुचराई करणा-या यंत्रणे विरुध्द योग्य ती दखल घेण्याच्या उद्देशाने काही उपाययोजना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.



384

**शासन निर्णय :-**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन राज्यातील ग्रामीण व नागरी भागातील जलशुध्दीकरण केंद्रास नियमित व आवश्यकतेनुसार अचानक भेट देऊन तेथील वापर, देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापनाची पाहणी करण्यासाठी प्रत्येक जिल्हयामध्ये खालीलप्रमाणे " **कायम अभ्यागत मंडळ** " गठीत करण्यास शासन मंजूरी देत आहे.

| | |
|---|---|
| १. जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद | सदस्य |
| ३. जिल्हयातील महानगर पालिकांचे पाणी पुरवठयाशीसंबंधित उपायुक्त | सदस्य |
| ४. जिल्हयातील नगरपरिषदांचे मुख्याधिकारी | सदस्य |
| ५. जिल्हयातील अभियांत्रिकी महाविद्यालयातील परिसर अभियांत्रिकी विषयातील प्राध्यापक | सदस्य |
| ६. जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |
| ७. शल्य चिकीत्सक सिव्हील हॉस्पीटल | सदस्य |
| ८. पाणी पुरवठा व स्वच्छता या क्षेत्रात भरीव काम करणारा जिल्हाधिका-यांनी नियुक्त केलेला जिल्हयातील एक सेवाभावी संस्थेचा प्रतिनिधी /नागरीक | सदस्य |
| ९. जिल्हयातील सर्वात जास्त खप असलेल्या वर्तमान पत्राचे संपादक | सदस्य |
| १०. उपभियंता (यांत्रिकी ) भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद | सदस्य |
| ११. जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी | सदस्य-सचिव |

२. या मंडळाने जिल्हयामध्ये असलेल्या प्रत्येक जलशुध्दीकरण केंद्रास **दोन महिन्यातून किमान एकदा** आणि पावसाळा किंवा तत्सम परिस्थितीचा आढावा घेवून **जिल्हाधिकारी ठरवतील त्यानुसार वेळोवेळी भेटी** देऊन त्या जलशुध्दीकरण केंद्राच्या उद्देशानुसार योग्य वापर, देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापनाच्या परिस्थितीची पहाणी करावी. यामध्ये केंद्रात **नियुक्त कर्मचा-यांची तांत्रिक कार्यकुशलता, वरिष्ठ तंत्रज्ञाचे व अधिका-यांचे नियंत्रण, उपांगाच्या शास्त्रीय वापराची वस्तुथिती, पाण्याची शुध्दीकरणा नंतरची प्रत, यंत्रसामुग्रीची देखभाल, केंद्रातील परिसर स्वच्छता, दुरुस्तीसाठी केलेली तत्पर व्यवस्था व प्रत्यक्ष अंमलबजावणी तांत्रिक बाबीच्या ठेवलेल्या नोंदी व अभिलेख** व इतर अनुषंगिक बाबींची प्रामुख्याने पहाणी व तपासणी करावी. एकूण आढावा घेता अभ्यागत मंडळाला आवश्यक वाटल्यास योजनेचे तांत्रिक लेखापरिक्षण करुन घेण्याची शिफारस संबंधित यंत्रणेला व शासनास करता येईल या पहाणीमध्ये आढळलेले दोष/त्रुटी दूर करण्यासाठी संबंधीत यंत्रणेस

कळविली व पुढील पहाणीच्या वेळी हया त्रुटी व दोष सुधारण्यात आले आहेत किंवा नाही यांची खातरजमा करुन घ्यावी. पाहणीमध्ये वारंवार त्रुटी/दोष आढळून आल्यास व ते दूर होत नसल्यास त्याबाबत समितीने तात्काळ शासनास अहवाल सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(सुधीर ठाकरे)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,
मा. राज्यपालांचे सचिव.
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
मा. उपमुख्यमंत्र्याचे सचिव.
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी.
सदस्य सचिव (प्रशासन), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
सदस्य सचिव (तांत्रिक ), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
सर्व महानगरपालिकांचे आयुक्त.
सर्व नगरपरिषदांचे मुख्याधिकारी.
संचालक, नगरपालिका प्रशासन मुंबई.
सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
सर्व जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी.
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
सर्व कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद.
संचालक, भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे.
सर्व उप संचालक, भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणा.
जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणा.
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासन अधिकारी.
निवडनस्ती पापु०७.



386